# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक : 14.10.2026** **वार : बुधवार**

---

## ठळक बातम्या

1. कचऱ्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभारणीसंदर्भात कृती दल स्थापन करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश.
2. गुंतवणूकदारांचे प्रकल्प वेगानं पुढे नेण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांशी तातडीनं समन्वय साधण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन.
3. युपीआय व्यवहारांवरचं एमडीआर शुल्क दिवाळीनंतर लागू होणार.
4. संभाव्य चारा टंचाईवर वेळीच मात करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग राज्यभरात 'चारा साक्षरता आणि संवर्धन अभियान' राबवणार.

## सविस्तर बातम्या

### मुख्यमंत्री सीबीजी प्रकल्प

राज्यातली शहरं कचरामुक्त करण्यासोबतच कचऱ्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस अर्थात सीबीजी निर्मिती प्रकल्प उभारणीसंदर्भात कृती दल स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. शक्य असेल तिथं राज्याच्या सीबीजी धोरणानुसार प्रकल्प उभारण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सीबीजी प्रकल्प आढावा बैठकीत ते काल मुंबईत बोलत होते. या प्रकल्पांमुळे कचरा उचलण्यासाठी महापालिकांना करावा लागणारा खर्च वाचणार असून, कचरामुक्त शहरांच्या उद्दिष्टाला चालना मिळेल, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

### महाराष्ट्र-युनायटेड किंग्डम भागीदारी

सर्वच क्षेत्रातल्या उद्योगांच्या, गुंतवणुकीसाठीच्या परिसंस्था निर्मितीत, महाराष्ट्र सर्वात आघाडीवर आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्र-युनायटेड किंग्डम भागीदारीचा प्रारंभ करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात ते काल मुंबईत बोलत होते. गुंतवणूकदारांचे प्रकल्प वेगानं पुढे नेण्यासाठी इन्व्हेस्ट महाराष्ट्र व्यासपीठाच्या माध्यमातून सर्व संबंधित यंत्रणांशी तातडीनं समन्वय साधला जाईल असं आश्वासन यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिलं.

या कार्यक्रमाला राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, वरीष्ठ अधिकारी आणि युनायटेड किंग्डमचे व्यवसाय आणि व्यापार राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स उपस्थित होते. भागीदारीसाठी महाराष्ट्राची निवड ही, आर्थिक ताकद, राजकीय स्थैर्य आणि नेतृत्व या निकषांवर केल्याचं युकेचे सचिव जोनाथन रेनॉल्ड्स यांनी सांगितलं.

**अनधिकृत इमारती बावनकुळे**

अनधिकृत इमारतींची बांधकामं आणि त्यांची बेकायदेशीर दस्तनोंदणी रोखण्यासाठी राज्य सरकारनं कठोर पावलं उचलली आहेत. ज्या इमारतींमधील त्रुटी दूर करून त्यांचं नियमितीकरण करणं शक्य आहे, त्यांच्याबाबत नियमानुसार कार्यवाही केली जाईल; मात्र ज्या इमारती कायदेशीर करणं शक्य नाही, त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल नागपूर इथं प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते.

राज्याच्या विविध भागांत रेरा नोंदणी आणि आवश्यक परवानग्यांशिवाय इमारती उभारल्या जात असल्याच्या तक्रारी विधिमंडळात करण्यात आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर सरकारनं ही कठोर भूमिका घेतली आहे.

**युपीआय एमडीआर**

युपीआय व्यवहारांवरचं एमडीआर शुल्क दिवाळीनंतर लागू होणार आहे. भारताच्या राष्ट्रीय देयक महामंडळानं समाज माध्यमांवरच्या संदेशाद्वारे ही माहिती दिली आहे. आगामी सणांचा काळ लक्षात घेऊन युपीआय आणि सेवा सुकाणू समितीनं हा निर्णय घेतला असल्याचं या संदेशात नमूद करण्यात आलं आहे.

**आंदोलन न्यायालय**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आंदोलन करणाऱ्यांना ताब्यात घेण्याच्या कारवाईविरोधात सरसकट आदेश जारी करायला मुंबई उच्च न्यायालयानं नकार दिला आहे. मात्र, ही कारवाई करताना कायद्याचं उल्लंघन झाल्याचं आढळल्यास कारवाई करू, असं आश्वासनही न्यायालयानं दिलं. दिल्लीतल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ मुंबईत आंदोलन करणाऱ्यांना पोलिसांनी बेकायदा पद्धतीनं ताब्यात घेतल्याबाबतच्या याचिकेवर काल न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीवेळी याचिकेतल्या दाव्यांबद्दल माहिती घेण्यासाठी वेळ द्यायची सरकारची विनंती न्यायालयानं मान्य केली. पुढची सुनावणी 19 ऑक्टोबर रोजी होणार आहे.

**जनसेवा से देशसेवा अभियान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सार्वजनिक क्षेत्रातील कारकीर्दीची 25 वर्ष पूर्ण करत आहेत. यानिमित्त सुरू असलेल्या विशेष वृत्तमालिकेत आज जाणून घेऊया तिहेरी तलाक पद्धत बंद करणाऱ्या कायद्याविषयी...

***एक काळ असाही होता जेव्हा भारतातल्या मुस्लीम महिलेला तलाक हा केवळ एक शब्द 3 वेळा उच्चारुन घटस्फोट दिला जाऊ शकत होता. त्यासाठी कोणतीही पूर्वसूचना किंवा कारण द्यायची गरज नव्हती. घटस्फोटानंतर तिला कुठला आधारही नसायचा. 2019 च्या मुस्लीम महिला विवाह अधिकार संरक्षण कायद्याने ही परिस्थिती बदलली. या कायद्यानुसार तत्काळ तलाक बेकायदेशीर ठरवण्यात आला आणि तो गुन्हा मानून त्यासाठी तीन वर्षांपर्यंतचा कारावास आणि दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली.***

*एवढेच नाही तर या कायद्याने त्या महिलेला पोटगी मागण्याचा तसंच अल्पवयीन मुलांना स्वतःकडे ठेवण्याचाही अधिकार मिळाला. हा कायदा अमलात आल्यानंतर केवळ एका वर्षात तिहेरी तलाकच्या घटना 82 टक्क्यांनी कमी झाल्या.*

*भारतातल्या प्रत्येक महिलेला मग ती कोणत्याही धर्माची असो, तिचा घटनात्मक अधिकार मिळाला पाहिजे हा पंतप्रधान मोदी यांचा विचार या कायद्यामुळे प्रत्यक्षात आला आणि इतकी वर्ष कायद्याच्या संरक्षणापासून वंचित असलेल्या महिलांना घटनात्मक अधिकार मिळाले. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून सुरेखा जोशी.*

**तटरक्षक दल हेलिकॉप्टर**

**'ALHMK-3'** हे प्रगत, स्वदेशी आणि वजनाने हलकं हेलिकॉप्टर काल भारतीय तटरक्षक दलामध्ये समाविष्ट झालं. तटरक्षक दलाच्या रत्नागिरी तळावर त्याचं स्वागत करण्यात आलं. 'आत्मनिर्भर भारत' धोरणांतर्गत तटरक्षक दलाची स्वदेशी उड्डाण क्षमता वाढवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचं पाऊल आहे. त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

*वयम् रक्षामः या आपल्या ब्रीदवाक्यासह देशाच्या किनारपट्टीचं रक्षण करणाऱ्या भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात 'CG 875' हे स्वदेशी बनावटीचं एएलएच एमके थ्री म्हणजेच प्रगत आणि वजनाने हलकं हेलिकॉप्टर समाविष्ट झालं आहे. तटरक्षक दलाच्या रत्नागिरी तळावर या हेलिकॉप्टरला पारंपरिक 'वॉटर कॅनन सॅल्यूट' देण्यात आला. रत्नागिरीच्या कमांडिंग ऑफिसरनी हेलिकॉप्टरसह क्रू सदस्यांचं स्वागत केलं. या हेलिकॉप्टरमुळे तटरक्षक दलाच्या पश्चिम किनारपट्टीवरच्या कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होणार आहे. या अत्याधुनिक हेलिकॉप्टरमध्ये प्रगत रडार असून, त्याद्वारे लांब पल्ल्यावर सतत पाळत ठेवून धोका ओळखून, त्याची प्रतिमानिर्मिती शक्य आहे. काही धोकादायक आढळल्यास त्याचा जलद आणि नेमका वेध घेण्यासाठी हेलिकॉप्टरमध्ये 12.7 मिलिमीटरची हेवी मशीन गन बसवण्यात आली आहे. या क्षमतेमुळे महाराष्ट्राच्या संवेदनशील किनारपट्टीवर देशाच्या सागरी हितसंबंधांचं रक्षण करण्याची तटरक्षक दलाची क्षमता लक्षणीयरीत्या वाढणार आहे. अशी 5 हेलिकॉप्टर्स इथे तैनात होणार असून, त्यातलं हे पहिलं हेलिकॉप्टर आहे. शोध आणि बचाव कार्य, तसंच प्रदूषण नियंत्रण आणि इतर मोहिमा हाती घेण्याची तटरक्षक दलाची क्षमताही यामुळे वाढणार असल्याचं दलाने म्हटलं आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.*

**'चारा साक्षरता अभियान'**

यंदाच्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आगामी काळात पशुधनासाठी हिरवा आणि वाळलेला चारा उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या संभाव्य चारा टंचाईवर वेळीच मात करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग राज्यभरात 'चारा साक्षरता आणि संवर्धन अभियान' राबवणार आहे. या अभियानात चारा जतन, पीक अवशेषांचा योग्य वापर, चाऱ्यावर प्रक्रिया, मुरघास निर्मिती आणि पर्यायी चारा उत्पादन याबाबत पशुपालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केलं जाईल. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी

यासंदर्भात प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्तांना मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

राज्यातील शेतकरी आणि पशुपालकांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून उपलब्ध चारा सुरक्षित ठेवावा, पीक अवशेषांची नासाडी टाळावी आणि त्यावर योग्य प्रक्रिया करून सकस चारा निर्मितीला प्राधान्य द्यावं, असं आवाहन पशुसंवर्धन विभागानं केलं आहे.

**<u>पाणी नियोजन</u>**

सेवा संकल्प अभियानांतर्गत सातारा जिल्ह्यात जलसंपदा विभाग आणि कृषी विभागानं पीक पद्धतीत बदल, कृषी उत्पादकता वाढ आणि पाण्याचं योग्य नियोजन याबाबत मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये बैठका, कार्यशाळा आणि मार्गदर्शन सत्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाण्याचा काटकसरीने वापर, आधुनिक सिंचन पद्धती आणि सुधारित पीक नियोजन याविषयी माहिती देण्यात आली.

**<u>वनराई बंधारे</u>**

सांगली जिल्ह्यातल्या खानापूर इथं वन विभागानं दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी पुढाकार घेतला असून, श्रमदानातून 28 वनराई बंधारे बांधले आहेत. वनक्षेत्रामधील नैसर्गिक पाणीस्त्रोतांवर सुमारे २२५ वनराई बंधारे बांधण्यात येणार असल्याची माहिती वनक्षेत्रपाल विलास पवळे यांनी दिली आहे.

**<u>आयसीसी रँकिंग</u>**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटना- आयसीसीनं सप्टेंबर महिन्यासाठी जाहीर केलेल्या गुणानुक्रमात भारताच्या महिला संघातली सलामीची फलंदाज शेफाली वर्मा आणि पुरुष संघाचा कर्णधार शुभमन गिल, सप्टेंबर महिन्यातले सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू ठरले आहेत. शुभमन गिलनं पाचव्यांदा तर शेफाली वर्मानं दुसऱ्या वेळेला हा बहुमान मिळवला आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहील तर मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**